# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ६२ वा ❑ शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मराठीच्या सक्तीवरून हिंसा व्हायला नको !


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आतापर्यंत देशात तमिळ आणि हिंदी भाषेचा वाद पाहायला मिळत होता, या सगळ्यात महाराष्ट्रात मराठी भाषेचा वाद चिघळला आहे. मगरराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) कार्यकर्ते मराठी भाषेला महत्त्व देण्यासाठी मोहीम राबवत आहेत. अशाच एका घटनेत, महाराष्ट्रात मराठी भाषेची सक्ती व्हावी आणि व्यवहारात ही भाषा वापरली जावी यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन सुरू केलं होंत. त्यानुसार, राज्यातील बँकांमध्ये मराठी भाषा वापरली जाते की नाही हे तपासण्याचे आदेश मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना (पक्ष कार्यकर्त्यांना) दिले होते. त्यानुसार, मनसेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या बँकांमध्ये जाऊन मराठी भाषेचा आग्रह धरला. काही वेळा हिंसक आंदोलन केलं. मनसे कार्यकर्त्यांनी मराठीला विरोध करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांच्या कानशीलात लगावल्या. मनसेच्या या आंदोलनानंतर उत्तर भारतीय विकास सेनेने राज ठाकरे यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं आहे.

अशाच एका घटनेत, काही दिवसांपूर्वी मुंबईतील पवई येथील एल अँड टी कंपनीतील एका सुरक्षा रक्षकाला अपशब्द वापरल्याचा आरोप करून मारहाण करण्यात आली. हा व्हिडिओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता

मराठी भाषेचा अपमान करणाऱ्यांविरुद्ध मनसे कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी, वर्सोवा येथील डी-मार्टमधील एका कर्मचाऱ्याला मराठी बोलता येत नसल्याने मारहाण करण्यात आली होती. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता, ज्यामध्ये मनसे कार्यकर्ते कर्मचाऱ्याचे कान धरून माफी मागताना दिसत होते.

महाराष्ट्रात मराठी भाषेचा सन्मान झालाच पाहिजे.शासकीय कामकाजाची भाषा म्हणून मराठी भाषेला प्राधान्य देण्यात आले आहे..मात्र मराठी भाषेच्या सक्तीवरून हिंसा व्हायला नको! हिंसा मारझोड करणे योग्य आहे का? हे कितपत सयुक्तिक आहे ?

महाराष्ट्रात मराठी भाषेच्या वापरावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, अखिल भारतीय बँक कर्मचारी संघटनेने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) इशारा दिला आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधत बँक कर्मचारी संघटनेने म्हटले आहे की, जर बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर हल्ला झाला तर ते रस्त्यावर उतरून निषेध करतील. आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मुद्द्यावर कडक भूमिका घेतली आहे आणि मराठी भाषेचा वापर करण्याची मागणी करणाऱ्या कायद्याचे उल्लंघन कोणी केले तर ते खपवून घेतले जाणार नाही, असे म्हटले आहे.

मराठीच्या समर्थनार्थ कायदा हातात घेणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक स्वरात म्हटले आहे.मुंबईत पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, ''मराठी भाषेचा वापर करण्याचा आग्रह धरणे चुकीचे नाही, परंतु या काळात जर कोणी कायदा हातात घेतला तर ते अजिबात सहन केले जाणार नाही. अशा लोकांवर योग्य ती कारवाई केली जाईल.''

अलिकडेच, आरएसएस नेते भैयाजी जोशी यांनी विलेपार्ले येथे झालेल्या एका कार्यक्रमात म्हटले होते की, मुंबईत राहण्यासाठी मराठी बोलणे आवश्यक नाही. त्यांनी म्हटले होते की जर तुम्ही मुंबईतील घाटकोपरमध्ये राहत असाल तर तुम्हाला तिथे बहुतेक गुजराती भाषिक लोक आढळतील, त्याचप्रमाणे गिरगावमध्ये तुम्हाला हिंदी भाषिक कमी आणि मराठी भाषिक जास्त आढळतील. म्हणून, जर तुम्हाला मुंबईत राहायचे असेल तर तुम्हाला मराठी शिकावीच लागेल असे नाही. यावर जेव्हा गदारोळ झाला तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्वतः म्हणावे लागले की जर कोणी मुंबईत राहत असेल तर त्याने मराठी शिकली पाहिजे.

विशेष म्हणजे महाराष्ट्र सरकारने सर्व सरकारी, निमसरकारी आणि महानगरपालिका कार्यालयांमध्ये मराठी भाषा सक्तीची केली आहे. मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र सरकारने सरकारी कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या वापराबद्दल एक सरकारी ठराव जारी केला आहे.आदेशात म्हटले आहे की, महाराष्ट्र सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या सरकारी कार्यालये, निमसरकारी कार्यालये, महामंडळे आणि इतर सरकारी संबंधित कार्यालयांमधील सर्व कर्मचाऱ्यांना भारताबाहेरून आणि इतर बिगर-मराठी भाषिक राज्यांमधून येणाऱ्यांना वगळता त्यांच्या कार्यालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना मराठी भाषेचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात सर्व कार्यालयात मराठी अनिवार्य करण्यात आली असली तरी खरंच सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये मराठीचा वापर होतो का? यावर देखील चिंतन होणे आवश्यक आहे.. महाराष्ट्र सरकारने काढलेल्या आदेशात म्हटले आहे की भारताबाहेरून आणि इतर बिगर-मराठी भाषिक राज्यांमधून येणाऱ्यांना वगळता भाषेचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.सरकारच्या या आदेशानुसार इतर राज्यातील अधिकारी किंवा नागरिकांना मराठी भाषेची बोलण्याची सक्ती नाही..बँकांमध्ये वेगवेगळ्या राज्यातील अधिकारी कार्यरत आहे..या लोकांनी मराठी भाषेचा वापर केला नाही, मराठीतूनबोले नाही तर त्यांना मारझोड करणे कोणत्याच कायद्यात बसत नाही.तेव्हा मराठीच्या सक्ती वरून हिंसा, मारझोड करू नये..एवढेच या निमित्ताने सांगणे आहे.

# आधार माणुसकीचा वडखेलच्या लेकी ला ''लाख'' मोलाची मदत

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**अंबाजोगाई/सुनिल सिरसाट**

– परळी तालुक्यातील वडखेल-तांडा येथील अत्यंत गरीब ऊसतोड मजुराच्या लेकीला अंबाजोगाई येथील प्रख्यात समाजसेवक ॲड.संतोषरावजी पवार यांच्या आधार माणुसकीच्या सामाजिक संस्थेकडून वसतिगृहाची फीस भरण्यासाठी लाडक्या बहिणीच्या पुढे जाऊन लेकीला ''लाख'' मोलाची मदत झाल्याने गरजवंत कुटुंबासह वडखेलच्या गावकऱ्यांकडून आधार माणूसकीचा या सामाजिक संस्थेचे मोठे कौतुक होत असून कुटुंबासह गावकऱ्यांनी ॲड. संतोष पवार यांचे मनापासून आभार मानले आहेत.

परळी वै. तालुक्यातील ऊसतोड कामगार अरुण दामोदर चव्हाण या दांपत्याची कन्या कु. कल्पना ही पुणे येथील नामांकित असलेल्या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये बी.एस.सी. नर्सिंग या पदवीच्या तृतीय वर्षात शिकत असून तिची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने प्रवेश घेतल्यापासून संस्थेच्याच सर ससून डेव्हिड हॉस्पिटल मध्ये ती राहते. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने सुरुवातीची दोन वर्षे पोटाला चिमटा घेत चव्हाण दाम्पत्य आणि वयोवृध्द आजी-आजोबांनी मजुरी करून आपल्याकडे येणाऱ्या अत्यल्प मजुरीतून काटकसर करून संस्थेला विनंती करत कशीबशी दोन वर्ष वसतिगृहाची थोडीफार फीस भरत दोन वर्ष मागे टाकले खरे, परंतु यावर्षीच्या अंतिम टप्प्यात एक रुपयाही भरणे शक्य नसल्याने मुलीचे तिसरे वर्ष सुरू झाले तरीही एक रुपया हे फीस येत नसल्याने वस्तीगृह आणि संस्थेच्या मॅनेजमेंटने मुलीचा प्रवेश रद्द करावा लागेल असे पालकाला आणि विद्यार्थिनीला कळवताच त्यांना फार मोठा धक्का बसला. या धक्क्यातून आपण कदाचित सावरुच शकत नाहीत हे लक्षात आल्याने हातबल विद्यार्थिनीला तर काय करावे हेच कळेना. परंतु मुलांपेक्षा आपली मुलगीच खूप हुशार असल्याने तीच घराचा आणि आमचा उद्धार करेल या अपेक्षेने मुलीसाठी कायम धडपड दाखवणाऱ्या बापाच्या पुढे आभाळा एवढा डोंगर उभा राहिल्याने हातबल बापाच्या डोळ्यात मुलीचा प्रवेश रद्द होतो आहे हे कळल्यानंतर आपसूकच डोळे भरून आले. हतबल बापाने आपल्या जवळच्या मित्राला फोन करून सर्व आपबिती सांगितली. फोनवर बोलत-बोलत हतबल बाप इतर आयुष्य संपवलेल्या बापांप्रमाणे आपसूकच मलाही आता आत्महत्येशिवाय पर्याय नाही असा बोलून गेला. परिस्थिती ओळखून मित्राने कसेबसे समजावले. बापलेक दोघेही वाईट विचारातून बाजूला झाले खरे, परंतु आता पुण्यासारख्या शहरात आपणास कोण मदत करेल आणि गावाकडे जाऊन गावात व नातेवाईकांना काय सांगावं....? या विचाराने गांगावून गेलेल्या बापलेकीला पुण्यातील कुणाकडून तरी आणि आंबेजोगाई येथील सिरसाट नामक मित्राने आधार माणुसकीचा या सामाजिक संस्थेचे वैद्यकीय आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठीचे अगदी भरीव काम असल्याचे आणि या संस्थेने आतापर्यंत शेकडो गरजवंतांना डॉक्टर-इंजिनिअर घडवल्याचे माहित असल्याने आपण एकदा हा विषय ॲड. संतोष पवारांना बोलून बघू असे सांगून ही व्यथा तथा करूनकहाणी पवार यांना सांगताच आतापर्यंत हजारो गरजवंत विद्यार्थ्यांची आणि हजारो आत्महत्याग्रस्त पीडित शेतकरी कुटुंबाचा आधार बनलेल्या आधार माणुसकीच्या या सामाजिक संस्थेने म्हणजेच संतोष पवार यांनी क्षणाचाही विलंब न करता आपले सहकारी जेष्ठ पत्रकार तथा संस्थेचे संचालक प्रशांत बर्दापूरकर आणि विनंती धारक मित्रवर्य पत्रकार सुनील सिरसाट यांना सोबत घेऊन अंबाजोगाईहून २५-३० किलोमीटर दूर असलेल्या वलखेड तांडा येथे जाऊन संस्थेच्या नियमाप्रमाणे कुटुंबीयांची भेट, स्थळ पाहणी आणि गाव चौकशी ही प्रक्रिया पडताळून घेतली आणि जणू काही शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येते का काय अशा चिंताग्रस्त ताणतणावात असलेले चव्हाण कुटुंबीय आणि बी.एस.सी. नर्सिंग या पदवीचे शिक्षण घेत असलेली कु. कल्पना जी की अभ्यासात आपल्या कॉलेजच्या पहिल्या पाच मध्ये गुणवत्तेत असतानाही आपली पदवी आता पूर्ण होणार की नाही....?? या काळजीत असतानाच आधार माणुसकीने नेहमीप्रमाणे माणुसकी जपत मोठा आधार कल्पनाला देऊन तिने कल्पनाही केली नसेल एवढा मोठा आधार देत तिच्या तृतीय वर्षाची लाख रुपयांची



संपूर्ण फीस दुसऱ्याच दिवशी वस्तीगृह तथा संस्थेच्या खात्यावर जमा केली.

कल्पनाने पाहिलेल्या स्वप्नांचा जणूकाही चुराडा होणार एवढ्यात झालेल्या या मदतीच्या ओघाने कु. कल्पनाने पाहिलेल्या स्वप्नांची पूर्तता होण्यासाठी आज पर्यंतच्या शेकडो-हजारो गरजवंत विद्यार्थ्याप्रमाणे आता आमची कल्पनाही शिकणार-घडणार या आनंदात तिच्या कुटुंबासह ॲड.संतोष पवार, प्रशांतजी बर्दापूरकर आणि त्यांचे सहकारी यांच्याही चेहऱ्यावर आनंद ठळक मी दिसून येत होता. खरच नावाप्रमाणे ॲड. संतोष पवार यांची ही सामाजिक संस्था अलीकडच्या काळात विशेषतः कोरोना पासून तर कल्पनेच्या बाहेर माणुसकी जपत जिथे खरंच गरज आहे तिथे पोहोचून कित्येक कुटुंबांचा-पिडीतांचा आधार बनलेली आहे. या संस्थेच्या मदत कार्याची व्याप्ती आणि तिचे काम पाहून राज्य आणि राज्या बाहेरून या संस्थेला मदत करणाऱ्यांचा आकडा आता दिवसेंदिवस वाढतो आहे. तर दुसऱ्या बाजूने संस्थेने आतापर्यंत वैद्यकीय आणि इंजीनियरिंग क्षेत्रात मदत केलेले बरेच विद्यार्थी-विद्यार्थिनी पुढच्या दोन-तीन वर्षात मोठमोठे डॉक्टर-इंजिनिअर होऊन आपल्या भूतकाळाची आणि संस्थेच्या मदतीची आठवण ठेवत येणाऱ्या काळात आपल्यासारख्याच पीडित-गरजवंतांना आणि संस्थेलाही मोठी मदत करतील यात दुमत असण्याचे कारण नाही. तेंव्हा आज आहे तेही काम-योगदान वखागण्याजोगेच आहे. परंतु येणाऱ्या काळात अंबाजोगाईची आधार माणुसकीची ही सामाजिक संस्था राज्य आणि देशपातळीवर खूप मोठी सामाजिक कार्य करणारी संस्था असेल यातही आता कोणाला शंका राहिलेली नाही.....!

# जिल्हा परिषद शिक्षिका सौ.कस्तुरी कुलकर्णी-जोशी यांचा गौरव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ॲमेझॉन फ्युचर इंजिनिअरिंग व लीडरशिप फॉर इक्विटी ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान तंत्रज्ञान शिक्षक प्रशिक्षण स्पर्धेत जि.प.प्रा.शा. गारज, केंद्र बाभुळगाव, ता.वैजापूर येथील उपक्रमशील तथा तंत्रस्नेही शिक्षिका सौ.कस्तुरी कुलकर्णी – जोशी यांनी जिल्ह्यातून ८ वा क्रमांक पटकावला आहे. याबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण मॅडम, संचालिका राठोड मॅडम, प्राचार्या सानवी देशमुख मॅडम, विभाग प्रमुख प्रकाश मांटे सर यांच्या हस्ते सौ.कस्तुरी कुलकर्णी-जोशी यांचा सोमवारी लॅपटॉप व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या यशाबद्दल शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, गावकरी मंडळींनी अभिनंदन केले आहे.





# डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त समता पंधरवडा कार्यक्रम संपन्न




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**बीड** –स्वा सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त समता पंधरवडा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या निमित्त जात पडताळणी विषयी मार्गदर्शन सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग बीड चे संजय गुजर यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना केले विविध योजना शिक्षणासाठी आहेत याचा लाभ घ्यावा, महाविद्यालयात विशेष कॅम्प आयोजित केला जाईल व सर्व सहकार्य केले जाईल असे उमेश जगताप यांनी अश्वारून दिले यावेळी विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, प्राचार्य विठठल काळे विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे प्रा संतोष जोशी प्रा शशिकांत पसारकर सुरेश चव्हाण यांची उपस्थिती होती.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...

## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

ज्योतिर्मय साहित्य

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्तता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.


## आनंदाची गुढी

ज्योतिर्मय साहित्य

गुढीपाडवा हा सण देशाच्या सगळ्या भागात साजरा होतो. दक्षिण भारतात त्याला युगादी किंवा उगादी असे म्हटले जाते. काही ठिकाणी पाडो किंवा पाडवा असेही म्हटले जाते. गुढीपाडवा हा सण आजचा नाही. असे ,म्हणतात की ब्रह्माने याच दिवशी सृष्टी निर्मिली. गुढीपाडव्याचे संदर्भ हजारो वर्षांपासूनच्या वाङ्मयात आपल्याला मिळतात. अगदी रामायणापासून त्यांची सुरुवात होते. गुढी या शब्दाचा अर्थ तामिळ भाषेत लाकूड किंवा काठी असा होत असला आणि प्राचीन मराठी वाङ्मयात गुढी या शब्दाचा झोपडी, कुटी वगैरे असा असला तरी खरं म्हणजे गुढी हा शब्दच आनंदासाठी आला आहे. एखादं मोठं काम करणं, शत्रूवर विजय प्राप्त करणं, हाती घेतलेल्या कामात यश मिळणं या सगळ्या गोष्टींसाठी गुढी उभारणे असा वाक्प्रयोग केला जायचा. माधवदासांनी लिहिलेल्या उत्कट साधूनि शिळा सेतू बांधुनी... या श्रीरामांच्या मराठी आरतीत पुढील ओळी किती सुंदर आहेत बघा –

प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला ।
लंकादहन करुनी अखया मारिला ।।
मारिला जंबू माळी, भुवनी राहाटीला
।
आनंदाची गुढी घेऊनिया आला ।।

श्रीरामांनी रावणाचा वध केल्यानंतर म्हणजेच एक अलौकिक असे कार्य संपन्न केल्यानंतर हनुमंत आनंदाची गुढी घेऊन आला. इथे गुढी म्हणजे विजयपताका असा अर्थ घेता येईल. अयोध्येच्या नगरजनांनी सडे शिंपून, रांगोळ्या काढून आणि गुढया तोरणे उभारून श्रीरामांचे स्वागत केले. श्रीकृष्णाने कंसाचा वध केला तेव्हाही नगर वासियांनी श्रीकृष्णाचे असेच स्वागत केले होते असे म्हणतात.







महाभारताच्या आदिपर्वात गुढीचा उल्लेख आढळतो. खरं तर असाही अर्थ घेता येईल की आपला देह हीच एक नगरी आहे. आपल्या हृदयमंदिरात आपण आनंदाची गुढी उभारून श्रीराम, श्रीकृष्ण यांचे स्वागत करतो. त्यासाठी हृदयाचे दरवाजे उघडे हवेत. आपल्या मनातील काम, क्रोध आदी वासना जेव्हा नष्ट होतील, त्यांच्यावर विजय प्राप्त होईल, तेव्हाच श्रीरामांचा प्रवेश आपल्या हृदयमंदिरात होईल. परमेश्वर हा आनंदस्वरूप आहे. तो सत चित आनंद म्हणजेच सच्चीदानंद आहे. तो आपल्या हृदयात प्रवेशला की आनंदाची गुढी आपोआपच उभारली जाते.

स्त्रीला आदिशक्ती मानून तिची पूजा पूर्वीपासून केली जाते. माता पार्वती म्हणजे आदिशक्ती. शंकर आणि पार्वती यांचा विवाह पाडव्याच्या दिवशी ठरला आणि तृतीयेच्या शुभमुहूर्तावर तो पार पडला. तेव्हापासून पाडव्याला स्त्रीच्या रूपात आदिशक्तीची पूजा केली जाते. गुढीपाडव्याचा उल्लेख म्हाईभट यांनी लिहिलेल्या लीळाचरित्रातही आढळतो. ज्ञानेश्वरीत सुद्धा गुढीचा उल्लेख येतो. ज्ञानेश्वर माउली म्हणतात–

अधर्माची अवधी तोडी । दोषांची लिहिली फाडी।
सज्जनांकरवी गुढी । सुखाची उभवी ।।






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## स्वगुण परीक्षा

ज्योतिर्मय साहित्य

(समास तिसरा)

जे संतांना जमले ते आपण पण करण्याचा प्रयत्न करूया. जन्म म्हणजे कुविद्येचेफळ होय. अज्ञान जोपर्यंत असते र वासना असते. लाकुड कोरणारा भुंगा जसा कमळात अडकून पडतो.तसा ब्रम्हस्वरूप जीव आसक्तीत गुंतुन देहात जन्म घेतो. जन्म म्हणजे जीवाचे बंधन होय.जन्म म्हणजे सुखाचा विसर होय. मानवी मनात भय,चिंता ,काळजी,द्वैश मत्सर या सगळ्याच्या गदारोळात मानवी मन म्हणजे कल्पनेचा छाप किंवा शिक्का आहे. मायेच्या लिलेने जीव फसतो. ,जन्म म्हणजे मायेने केलेले गाचे वीरपण म्हणजे जन्म होय. अगदी लहान बालका पासून ते जरा जर्जर झालेल्या म्हातारे माणसा पर्यन्त क्रोधाच्या तावडीतून कोणीही सुटला नाही. अहंतेचा गुण म्हणजे जन्म होय. मी लेखाच्या सुरवातीला म्हणले आहे की मी पण कार्यप्रवण झाले की अहंकार जीवाला जन्म देतो. जन्म म्हणज ईश्वराचे विस्मरण होय. अविद्येतुन वासना ऊमटते आणि वासनेतुन जन्म होतो. इंद्रिय ची आवड म्हणजे जन्म होय.

विषय शब्दाचा अर्थ पाहू गेल्यास''विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च'' ज्याच्या ठिकाणी इंद्रिये व मन बुडून जातात मग्न होतात म्हणजे इंद्रीयभोग अर्थात देहातून सुख घेण्याची आवड. कधीही समाधान न होणाऱ्या आशेच्या साखळीने माणुस बांधलेला असतो. भगवंताचा विसर पडणे म्हणजे वाईट काळ समजावा. आत्मबुध्दी विसरून देहबुद्धी त जाण म्हणजे स्वर्गातुन नरकात पडण्या सारखे आहे. समर्थानी दहाव्या ओवी पासुन अठराव्या ओवी पर्यतचा प्रवास म्हणजे शरिराच्या जन्माची क्रीया ते समजून घेत असताना आपल्याला आपल्याच शरीराची किळस येते. शरीर वरवर कितीही चांगले वाटलेतरी त्यात डोकावून पहाता ते किती घाणीचै साम्राज्य आहे. हे वरील ओव्या वाचताना खात्री पटते. घाणीने भरलेले हे शरीर कितीही निर्मळ करायचा प्रयत्न केला तरी ते स्वच्छ होत नाही. समर्थींनी डोकं या अवयवाला मात्र ऊत्तमांग म्हणलं आहे. मल मुत्र ओक हे जर शरिराचे झाले नाही तर मनुष्य लवकरच मरेल. **क्रमशः**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## अखंड समाधानाचा मार्ग ।

ज्योतिर्मय साहित्य

चित्तात राखावे समाधान ।। चित्तांत ज्याचे राहिले समाधान । तोच भगवंताचा आवडता जाण ।। ज्याचा विश्वास रामावरी । त्याला समाधान स्वीकारी ।। माझे हित रामाचे हाती हा धरिता विश्वास । समाधान मिळत असे जीवास ।। दु:ख ही परमात्म्याची इच्छा जाणून जो भगवंताचा झाला । त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ।। प्रारब्धाने देहाची स्थिति । हे सर्वच सांगती । पण त्यात मानता येते सुख समाधान । ध्याता एक रघुनंदन ।। तात्पुरते काही तरी औषध घ्यावे । देहाच्या लोभात न सापडावे ।। माझे सांगणे दुजे नाही । जोवर श्वासोच्छवास देही । तोंवर मुखी नाम पाही ।। तरीपण मी सांगतो एक । ठेवावा रामावर विश्वास । तोच साह्यकारी होईल खास ।।

असावे शुद्ध आचरण । करावे भगवंताचे स्मरण ।। कर्तव्याची ठेवावी जागृति । त्यात भगवंताची राखावी स्मृति ।। नामाविण नाही दुजे साधन । हे सांगत आले सर्व संतजन ।। देहाचे अस्तित्व भगवंतासाठी। याहून नाही दुजी उच्च प्राप्ति ।। देहाचे भोग देहाचे माथी । ऐसे सर्व सांगती । परि एक वाटतसे चित्ता । ते दूर होतील एक भगवंत चिंतिता ।। भगवंतावाचून देहाचे सुखभोग । हे न मानिती साधुसज्जन ।। आता जगणे रामासाठी । हा निश्चय मानावा चित्ती ।। जगातील वैभव ऐश्वर्य संपत्ति । लौकिक आणि कीर्ति । हे परमात्म्यावाचून मातीमोल साधुसंत गणती ।। आजवर झाले कष्ट फार । देहाचा भरवसा धरून थोर ।। देहाचे सुखसौख्य आदरसत्कार । हे प्रारब्धाधीन सत्य जाण ।। मुलींनी खेळ मांडला । परि नाही कामाला आला । तैसा प्रपंची थोर झाला । परमात्म्याचा तो न म्हणावा भला ।। रामापरते सत्य नाही । श्रुतिस्मृति सांगतात हेच पाही ।। आता न ठेवावा जगी भरवसा । राम सखा करावा खासा ।। रामाविण अन्य प्रीति । उपजे देहबुद्धीचे संगती ।। आता राम एकच करी ।। तुझा विसर न पडो अंतरी ।। आता जसे असेल तसे होऊ द्यावे । रघुनाथभजनी असावे ।। मागील झाले होऊन गेले । पुढील येणार येऊ द्यावे भले ।। आत न धरावा हव्यास । हेच वाटे जीवास ।। जे जे करणे आणिले मनी । रामकृपे पावलो जगी । माझे आता काही । दुसरे मागणे नाही।। माझे कोणी नाही । मी कोणाचा नाही । जग आणि देह अगदी माझे नाही ।। जे जे काही दृश्य पहावे। त्याचे रूपांतरच व्हावे । हा नेहमीचा अनुभव ठेविता चित्ती । समाधानाची होय प्राप्ती ।।

जोवर श्वासोच्छ्वास देही। तोवर मुखी नाम पाही।।

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या ७

ज्योतिर्मय साहित्य

आज काही अनुभव सांगणार आहे, ''साप'' या विषयी.

खरे तर या सगळ्या प्राण्यांची आपल्याला भीती का वाटते? तर मोठी माणसे भीती दाखवतात. बरेचदा त्यांना आलेले व न आलेले कोणाचे तरी ऐकीव अनुभव त्यांच्या मनात असतात. आणि तीच भीती किंवा काळजी असते, म्हणून ते सांगत असतात. पण त्यातून गैरसमज, अंधश्रद्धा, काही दंतकथा उदयाला येतात.

मी लहान असताना असेच काही ऐकले होते. एक साप पहिल्या मजल्यावर निघाला. तर सगळे घाबरले. म्हणे साप जीना चढत नाही. आणि त्यामुळे खूप उलट सुलट चर्चा होऊन भीतीचे वातावरण निर्माण होत. ज्या वयात मुलांना फारशी भीती वाटत नाही अशा वयाची मी होते. आणि आम्ही रहात होतो तेथे साप अगदी सहज दृष्टीला पडायचे. मग आमच्या वाड्यात येणाऱ्या एका सापाचा मी पाठलाग केला आणि त्याला छान जीना चढताना पाहिले. आणि सगळ्यांना ठामपणे साप जीना चढतो हे सांगू लागले.

आम्ही ज्या ठिकाणी रहात होतो त्या ठिकाणी त्यावेळी वीज नव्हती. प्रत्येकाच्या घरात निरनिराळे दिवे लागलेले असायचे. त्या दिव्याच्या उजेडात सर्वांच्या सावल्या खूप मोठ्या दिसायच्या आणि त्यातून बऱ्याच भयकथा जन्म घ्यायच्या. मग तिथे सार्वजनिक दिवे लागले. आणि काही घर मालकांनी सुद्धा वीजेची जोडणी घेतली. मात्र भाडेकरूंना मर्यादित वीज मिळायची. ते घरमालक संध्याकाळी ७ ते १० असा वीज पुरवठा करायचे. आणि भाडेकरूंनी तेवढीच वीज वापरायची. त्यातही बचत व्हावी म्हणून आमच्या घरमालकांनी एक युक्ती शोधली होती. ते सर्वांना रात्री ८ वाजता त्यांच्या बैठकीत गप्पा मारायला बोलवायचे. सगळे नोकरदार असल्याने तेही यायचे. त्या बैठकीत मस्त पांढऱ्या बेडशीट्स, पांढरे लोड असायचे. त्याला टेकून मस्त गप्पांची बैठक जमायची. प्रत्येकाला टेकायला लोड का असतात हे बैठक संपल्यावर लक्षात यायचे. गप्पा झाल्या की प्रत्येकाने आपला लोड हळूच पुढे घ्यायचा. की कोणाच्या तरी लोड मागे साप बसलेला असायचा. कधी कधी २/३ पण असायचे. मग ते साप हळूच आपल्या मार्गाने निघून जायचे. कुणीही कधीही त्यांना मारले नाही. याच गावात कोणाला साप चावला की त्याला भैरोबाच्या देवळात घेऊन जायचे. कडू लिंबाच्या पानांवर झोपवत असायचे. आणि रात्रभर घंटानाद करायचे. ज्याला साप चावला आहे त्या व्यक्तीला झोप लागू नये म्हणून हा उपाय होता. तिथे ठेवल्याने सापाचे विष उतरुन जाते. असा समज होता. तेथील बरेच साप बीन विषारी असायचे. मात्र काहींना विषारी सर्पदंश झाला की तेथील सरकारी रुग्णालयात दाखल करायचे. हळूहळू सगळेच दवाखान्यात जाऊ लागले.

(क्रमश)



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातुलो जल्पको वा**
**धृष्टः पार्श्वे वसति च सदा दूरतश्चाप्रगल्भः ।**
**क्षान्त्या भीरूर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः**
**सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ।।**

अर्थ – सेवक मौन राहीला, तर तो मुका आहे, असे म्हटले जाते. वाक्पटु असेल, तर त्याला वाचाळ म्हणजे बडबडा म्हणतात. नेहमी मागे राहत असेल, तर त्यास धृष्ट संबोधण्यात येते. नेहमी दूर राहत असेल, तर त्यास अप्रगल्भ म्हणतात. सहनशील असेल, तर भित्रा म्हणतात. सहन करीत नसेल, तर अयोग्य म्हणतात. नक्कीच, सेवाधर्म परम गहन आहे. तो योगिजनांसाठीही अगम्य आहे.

सेवा करणे अर्थात एखाद्याकडे सेवक म्हणून राहणे, कसे अवघड आहे; या विषयी या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी प्रतिपादन केले आहे. सेवकाच्या कोणत्याही वागण्याचा कसा चूकीचा अर्थ काढण्यात येऊ शकतो, या विषयी या श्लोकात विस्तृतपणे सांगण्यात आले आहे.




ज्योतिर्मय साहित्य

अवधान एकले दिजे .या ऐकलेल्या वचनांचा आपल्या व्यक्तीमत्वावर परिणाम झाला पाहिजे. श्रीतवो मंतव्यो निधीध्यासो असे म्हटले आहे.विधी सांगण्या साठी तव्य प्रत्यय वापरतात. विधी मागे शास्त्र असते.श्रवण हा विधी आहे. कांहीं अपूर्व आपणास कानी पडते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

तत्वमसी महावाक्य गुरु मुखातून आपल्या कानी पडावे. ज्ञानोबा म्हणतात अवधान द्या.तव्य प्रत्यय हा योग्यता यासाठी वापरला जातो.
ऐकायला परमेश्वर हा एकमेव योग्य विषय आहे.श्रवणास योग्य केवळ प्रभू आहे.

संसार करून सुखी झाला असा जगाच्या पाठीवर एखादा व्यक्ती दाखवा? पूर्वी राजे वैभवात असून का राज्य त्यागून वनात निघून गेले असतील? जड भरत यांनी एक कोटी वर्षे राज्य केले, पण एक क्षणात त्याचा त्याग ही केला.अंतःकरणात या संसाराबद्दल निर्ममत्व आले पाहिजे ना.? आमच्या श्रवणाचे विषय माऊली,तुकोबा, राम कृष्ण चरित्र हेच असावेत. भौतिक जगातील कांहींही नसले आणि आता राम माझा झाला ही भावना आली असेल तर, सर्व जग जिंकले असेच होईल. राम कथा म्हणजे केवळ कथा, गोष्ट रंजकता इतकेच नव्हे तर ते कथानक त्या एका गुणावरील केवळ एक वेष्टण आहे.तिथे वेगवेगळ्या भावनाची अभिव्यक्ती होत असते. कोणत्या प्रसंगी कसे वागावे,कसे वागू नये हे निसंदेह कळते ते चरित्र. राम ही व्यक्ती नसून ते एक तत्व आहे. ते जाणून घेण्या योग्य तत्व आहे.त्या प्रति आपण समर्पित ,एकनिष्ठ असावे. *आपल्या जवळील दोषांचा त्याग व गुणांची वृद्धी हाच परमार्थ असतो.




## हिमोग्लोबिन

ज्योतिर्मय साहित्य

हिमोग्लोबिन म्हणजे काय ?

हिमोग्लोबिन हे तांबड्या पेशींमधील प्रोटीन असून ते फुफ्फुसांकडून ऑक्सिजन शरीरातील उतींना पुरवण्याचे आणि उतींकडील कार्बनडॉय ऑक्साईड पुन्हा फुफ्फुसांकडे पोहचवण्याचे महत्वत्वपुर्ण कार्य करतात. पोषकतत्त्वांच्या कमतरतेमुळे रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते. खाण्यात लोहाची कमतरता असल्यामुळे हे प्रमाण कमी होते. हिमोग्लोबिन हा रक्तातील अतिशय महत्त्वाचा घटक असून, तो आयर्न (लोह) आणि प्रोटीन (प्रथिने) यापासून बनलेला असतो.

हिमोग्लोबिन टेस्ट

रक्त परिक्षणाद्वारे हिमोग्लोबिनची तपासणी केली जाते. १० ते १५ मिनिटात पूर्ण होते. हिमोग्लोबिन कमी झाल्यास रक्तातील ऑक्सीजनच्या वहनाची क्षमता कमी होते. ज्यामुळे लाल रक्त–कणिकांची ( रक्तातील लाल पेशींची) संख्या कमी होते आणि अनीमिया होतो. जर शरीरात हिमोग्लोबिनचा स्तर भरपूर कमी असेल तर किडनी रोग, रक्ताची कमतरता, कॅंसर, पक्षाघात यासारखे आजार होऊ शकता. हिमोग्लोबिन कमी झाल्यामुळे चक्कर येणे, त्वचा पिवळी पडणे, सुस्ती येणे अशा समस्या निर्माण होतात.

कोणकोणत्या कारणांमुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते..?

अयोग्य आहाराच्या सेवनामुळे, पोषणतत्वांच्या कमतरतेमुळे मुख्यतः आहारातील लोह, ब–१२ जीवनसत्व, फॉलिक एसिडच्या कमतरतेमुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते.

जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने. उदा. अपघातामुळे, शस्त्रक्रियेवेळी रक्तस्त्राव होणे, मुळव्याध किंवा मलाशयाचा कैन्सर, पोटाचा कैन्सर या विकारात रक्तस्त्राव झाल्यामुळे, किमोथेरपी औषधांच्या दुष्परिणामातून, किडन्यांचे विकार उद्भवल्याने, किडन्या निकामी झाल्याने रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी काय खावे व घरगुती उपाय


हिमोग्लोबिन कसे वाढवावे याची माहिती जाणून घेऊया. हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी बीट, काळ्या मनुका, खजूर, आंबा, पेरू, सफरचंद ही फळे खावीत. यामध्ये मोठ्या प्रमाणात लोह असते. हे रक्तातील हीमोग्लोबीनची निर्मीती करते आणि लाल रक्तकणांच्या सक्रियतेला वाढवते.


शिवाय काळे मनुके रात्री भिजत ठेऊन सकाळी खावे. तसेच भाजी बनवण्यासाठी लोखंडी कढईचा वापर करावा.

रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठीचा आहार

हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी जास्तीत जास्त हिरव्या भाज्या खाल्या पाहिजे. या व्यतिरिक्त तीळ, पालक, दूध व दुधाचे पदार्थ, अंडी, नारळ, शेंगदाणे, गुळ, मोड आलेल्या धान्यांचा रोजच्या आहारात समावेश करा यांमुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढेल.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या या भागात रवींद्रनाथांच्या काही स्त्रीपात्र प्रधान कथा आपण पाहणार आहोत. या कथांमधून त्यांनी सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनातील सुखदुःखे मांडली आहेत. त्यांच्या अंतरातील व्यथा, वेदना, तळमळ या गोष्टी यातून व्यक्त झाल्या आहेत. यातील काही कथांमध्ये ही स्त्री सोशिक आहे, अन्याय, अत्याचार सहन करणारी आहे. काही ठिकाणी ती अत्यंत स्वाभिमानी आणि बाणेदार आहे. परिस्थितीविरुद्ध बंड करणारी आहे. पण रवींद्रनाथांच्या सर्व कथांमध्ये एक समान धागा आपल्याला दिसतो. त्यांनी स्त्रीची प्रतिष्ठा जपली आहे. तिच्या सन्मानाला धक्का लागू दिलेला नाही. काही कथांमधील स्त्रिया या काळाच्या दृष्टीने खूपच पुढारलेल्या वाटतात. त्यातूनच रवींद्रनाथांचा सामाजिक आणि स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. काही ठिकाणी पुरुषी मानसिकतेला त्या पुरून उरताना दिसतात. त्यांना दोन शब्द सुनावण्याची हिंमत त्यांच्यात आहे. समाजाला दिशा देण्याची मानसिकता त्यांच्यात आहे. एक स्त्री म्हणून आत्मविकासाकडे त्या वाटचाल करताना दिसतात.

वही सारख्या त्यांच्या कथा समाजातील पुरुषी मानसिकता प्रकट करतात. स्त्रियांबद्दलचा समाजाचा मागासलेला दृष्टिकोन स्पष्ट करतात आणि शेवटी वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य या कथांमध्ये आहे. वही या कथेची नायिका एक लहान गोड मुलगी आहे. तिचं नाव उमा. उमा लिहावाचायाला शिकते आणि तिला कोण आनंद होतो ! तिच्या लिहिता येण्याचा आनंद ती भिंतीवर, पुस्तकावर, जमिनीवर असा सगळीकडे लिहून व्यक्त करीत असते. सुरुवातीला तिचं लेखन अगदी बाळबोध आहे. पण त्यातून तिला आनंद मिळत जातो. तिच्या घरातील मंडळी मात्र तिचा हा आनंद समजून घेण्यास असमर्थ दिसतात. त्या काळात लहान वयात लग्नं होत असत. तसंच उमाचं लग्नं नवव्या वर्षीच लावून दिलं जातं. प्यारीमोहन हे तिच्या नवऱ्याचं नाव. त्याला तीन बहिणी असतात.



## जात्यावरच्या ओव्या......

**नातेसंबंध : बहिण-भाऊ**

भाऊ म्हणे बाई
तू ही जन्माची कटकट
शेवाळली ईट
पाय दे ना बळकट ||२४||

नादान मुर्हाळी
नको धाडू मायबाई
वाट डोंगराची
याला सुचायची नाही ||२५||

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# उद्योजक तथा नेशन बिल्डर ; महात्मा जोतीराव फुले

**ज्योतिर्मय साहित्य**

**कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कंपन्याचे सामाजिक उत्तरदायित्व फंड या संकल्पनेचे व विचारांचे जनक, स्त्रियांचे आणि अस्पृश्यांचे कैवारी, समता आणि मानवतेचे पाईक, सामाजिक क्रांतीचे जनक, आघाडीचे उद्योजक, शेअर मार्केटचे अभ्यासक, कृषी व अर्थतज्ञ, क्रांतीबा महात्मा जोतीराव फुले यांची आज १९८ वी जयंती. यानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन...!**



महात्मा जोतीराव फुले हे केवळ समाजसुधारक वा शिक्षणक्रांतीचे जनकच नव्हे, तर ते दूरदृष्टीचे उद्योजक, शेती व आर्थिक क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेचा पाया रचत 'शेतीला व्यवसायाची' जोड दिली. त्यांनी सन-१८६३ साली 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' या कंपनीचे कार्यकारी संचालक म्हणून अनेक ऐतिहासिक कामे केली तसेच देशात अनेक पायाभूत सुविधा उभारल्या, ज्याचा फायदा आज महाराष्ट्र व देशाला होत आहे. या कंपनीचा उद्देश केवळ व्यवसाय करून नफा मिळवणे हा नव्हता तर या सामाजिक सुधारणांसाठी आवश्यक ते पाठबळ मिळावे हा मुख्य उद्देश होता. महात्मा फुले यांनी उद्योग, अर्थकारण, समाजकार्य यांचा योग्य समन्वय साधला. त्यांनी उभारलेल्या या प्रकल्पांची आणि चळवळींची गरज आजच्या भारतीय समाजाला आहे. आधुनिक भारताच्या औद्योगिक विकासासाठी महात्मा फुले यांचे विचार, कार्य दिशादर्शक व प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास वाटतो.

महात्मा फुले यांनी आपल्या 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' द्वारे अनेक मोठे व सार्वजनिक प्रकल्प पूर्णत्वास नेले. त्यांनी पुण्याहून साताऱ्याला जाणारा 'कात्रजचा बोगदा', पुणे शहराकडूंन नगरकडे किंवा संभाजीनगर मार्गावरील 'बंड गार्डनचा पुल' बांधला आहे. बंडगार्डनला आणि येरवड्याला जोडणारा मुळा-मुठेवरचा ब्रिटीशकाळातील पूल सन १८६७ साली बांधला. या पुलाचे आयुष्य १०० वर्षांचे होते. प्रत्यक्षात तो १४० वर्षे वापरात आला. आजही तो भक्कमअवस्थेत उभा आहे. फक्त सुरक्षिततेसाठी सध्या तो रहदारीला बंद करण्यात आला आहे. आज पुणे महानगर पालिकेच्या हेरिटेज विभागाने तेथे एक भव्य 'आर्ट प्लाझा' उभारला आहे. सन १८६७ साली 'फिट झेराल्ड ब्रिज', तसेच 'खडकवासला धरणाचा डावा कालवा'. पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीने बांधला. अशी मोठी कामे महात्मा फुले यांनी या कंपनीच्या माध्यमातून केली. ही कंपनी केवळ कॉन्ट्रॅक्टच घेत होती असे नव्हे, तर ह्या कंपनीच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी अनेक पुस्तके प्रकाशित केली. १८६५ मध्ये तुकाराम तात्या पडवळ यांचे 'जातीभेद विवेकसार' हे पुस्तक प्रकाशित केले, तसेच बौद्ध विचारवंत 'अश्वघोष' यांच्या 'वज्रसूची' हा ग्रंथ प्रकाशित करून लोकांपर्यंत पोहोचवले. पुण्यात त्यांनी एक पुस्तक विक्री केंद्रही उभारले होते, या केंद्राने समाजप्रबोधनाची मोठी भूमिका बजावली. आपल्या देशातील महिलांना सोन्याची खूप आवड आहे असे म्हणतात. हे दागिने तयार करण्यासाठी जे सोन्याचे 'मोल्ड्स' साचे लागतात, ह्या मोल्ड्सची संपूर्ण मुंबई प्रांताची होलसेल एजन्सी महात्माजीच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीकडे' होती. त्यावेळी मुंबई प्रांतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व सिंध हे भाग होते. या कंपनीच्या माध्यमातून आणखीन एक काम महात्मा जोतिबा फुले करत, ते म्हणजे पुण्याच्या हडपसर परिसरातून फळे, भाजीपाला रेल्वेने ते मुंबई येथील 'भाईखळा भाजी मार्केटला' पाठवले जात असत. त्यामुळे पुढे भाईखळा मार्केटला 'महात्मा जोतिबा फुले' यांचे नाव देण्यात आले. या कंपनी तर्फे करण्यात आलेले आणखीन एक काम म्हणजे, वेगवेगळ्या शिक्षण संस्था स्थापन करने, त्या संस्था चालवणे, त्याच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबवणे, वाचनालय स्थापन करने ही कामे आदी संस्था व कंपनी करत असे.

त्यांचे एक सहकारी तसेच 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'मधील भागीदार पोलास राजा लिंगू यांनी ''कॅम्प एज्युकेशन सोसायटीची'' स्थापना जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने सन १८८५ साली मुंबई येथे सुरू केली. ही संस्था आज देखील कार्यरत आहे. महात्मा फुले यांचे आणखीन एक सहकारी व्यंकु कालेवार जे त्यांच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'मध्ये भागीदार होते. त्यांनी सन १८८९ ते १८९६ या काळात मुंबई येथील महानगरपालिकेची ईमारत बांधली होती. रामय्या व्यंकय्या आय्यावरू यांनी देशातले सर्वात जुने 'भंडारदरा धरण' हे 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'च्या माध्यमातून बांधले होते. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांचा 'लक्ष्मी विलास' नावाचा राजवाडा सुद्धा त्यांच्या 'पुना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'ने बांधला होता. महात्मा फुले सात वर्ष पुणे आयुक्त पदावर होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण कामे केली. त्यापैकी त्यांनी बंद नळाद्वारे पाणी पुणे शहरात आणून ते शुध्द करून नळाने देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले होते. त्या काळी अशुद्ध पाण्याची समस्या खूप मोठी होती. त्यांनी खडकवासला धरणातून शेताकडे पाणी नेण्यासाठी कॅनॉल देखील बांधले. तसेच पुणे शहरात प्रत्येक पेठेमध्ये किमान 'एक दवाखाना' व किमान 'एक शाळा' असली पाहिजे, असा महत्वाचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पांद्वारे जोतीरावांनी आधुनिक स्थापत्यशास्त्र आणि औद्योगिक व्यवस्थापनाची पायाभरणी केली. यामुळे देशातील औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली आणि भारताच्या आर्थिक विकासाला बळकटी मिळाली.



डॉ. प्रकाश खेत्री,
छ. संभाजीनगर,
७८४३०९२२४४

आजच्या काळातील बहुतेक उद्योगपती फक्त आर्थिक नफा मिळवण्यासाठी उद्योग करतात, मात्र महात्मा फुले यांचे उद्योग व व्यवसाय हे समाजउभारणी, समाज सुधारणेसाठी होते. जोतीराव फुले यांनी आपल्या कंपनीद्वारे मिळवलेल्या नफ्यातील बहुतांश रक्कम सामाजिक सुधारणा आणि शिक्षणासाठी खर्च केली. स्त्री-शिक्षण, शेतकरी उध्दार, जातिनिर्मूलन,सामाजिक चळवळींसाठी आपली सर्व 'स्वकष्टार्जित संपत्ती' खर्च केली. आज 'बिल्डर' हा शब्द प्रामुख्याने बांधकाम व्यावसायिकांसाठी वापरला जातो. मात्र, महात्मा फुले 'नेशन बिल्डर' 'राष्ट्रनिर्माते' होते. त्यांनी केवळ इमारती, पूल, धरणे बांधली नाहीत, तर शेती, शिक्षण, समता, ममता, मानवता, बंधुता, सामाजिक न्यायाच्या विचारांची पायाभरणी करून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची चळवळ उभारली. महात्मा फुले यांनी 'शेअर मार्केट', भारतीय कृषी अर्थशास्त्रावरही लेखन केले आहे. भारताला औद्योगिक व्यवस्थापनाचा एक आदर्श घालून दिला आहे.

'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी' यांची त्याकाळात वार्षिक उलाढाल त्याकाळात टाटा यांच्यापेक्षा जास्त होती. सन- १८६९ साली टाटा यांच्या कंपनीची वार्षिक उलाढाल २००००/- रुपये होती, तर महात्मा फुले यांच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीची' वार्षिक उलाढाल ही २१०००/- रुपये होती. म्हणजेच तेव्हा ते टाटापेक्षा श्रीमंत होते. महात्मा फुले यांनी मिळविलेला नफा सामाजिक कामांसाठी मुक्तहस्ते खर्चून टाकला. ही स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून जोतीरावांनी तहहयात समाजकार्य केलं. आजच्या काळातील चे मूळ जनक महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारातच दडलेले आहे. आपण २०१३ ( , २०१३) च्या कलम १३५ अंतर्गत सरासरी नफ्याच्या २% खर्च करणे कंपन्यांना बंधनकारक केली आहे. खर्च न केल्यास आर्थिक दंड आणि कायदेशीर दंडाची तरतूद केली आहे. असा कोणताही कायदा नसताना महात्मा फुलेंनी आपल्या नफ्यातील १०० % वाटा सामाजिक उत्तरदायित्वासाठी खर्च केला आणि समाजक्रांतीचे जनक ठरले. आजपर्यंत भारताच्या इतिहासात आपल्या कंपनीच्या नफ्यातील एवढा मोठा वाटा समाजकार्यासाठी लावणारे महात्मा फुले हे एकमेव समाज क्रांतीकारक आणि उद्योजक आहेत. हा इतिहास कोणीही खोडू शकत नाही किंवा जगातील कोणताही उद्योजक व व्यावसायिक हा विक्रम मोडू शकेल किंवा गाठू शकेल असे मला वाटत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपला गुरू मानले, महात्मा गांधींनी त्यांना ''देशातील पहिले खरे महात्मा'' असे गौरवले, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना ''समाज क्रांतिकारक'' म्हणून संबोधले. तीन भिन्न वैचारिक विचारवंतांनी महात्मा फुल्यांचा यथोचित सन्मान आणि गौरव केला, ही बाब फुले यांच्या 'महात्मा' उपाधीची व द्रष्टेपणाची साक्ष देते. त्यांचा वारसा केवळ सामाजिक सुधारक म्हणून नव्हे, तर एक द्रष्टे उद्योजक, कृषी व अर्थतज्ज्ञ म्हणूनही ओळखला गेला पाहिजे. आजच्या उद्योजकांनी, समाजसुधारकांनी महात्मा फुले यांच्या विचार, कार्यातून प्रेरणा घेत, उद्योग - व्यवसायातून मिळालेला नफा समाजहित, कार्य,समाजउद्धारासाठी वापरता येतो, याचे उत्तम उदाहरण घालून द्यावे. महात्मा फुले यांचे वैचारिक अनुयायी व्हावे... ! हीच महात्मा फुले यांना खरी आदरांजली ठरेल...! असे मला वाटते.

# हृदयस्पर्शी साने गुरुजी यांच्या गोड गोष्टी

**ज्योतिर्मय साहित्य**

मुखपृष्ठ . सागर नेने यांनी रेखाटलेले हे चित्र अतिशय सुंदर आणि पुस्तकाच्या गोष्टीस अनुरूप आहे.

फुलाचा प्रयोग या गोष्टीत एकूण आठ भाग आहेत. दोघांचा बळी मत्सरी लोकांमुळे आजपर्यंत अनेक बळी घेण्यात आलेले आहेत. यासाठी आपला इतिहास साक्षी आहे . या गोष्टीतही दोन प्रधान यांचा बळी घेण्यात येतो. याचे चित्र हुबेहूब डोळ्यासमोर उभे राहते.

फुला या गोष्टीत फुला नावाच्या पंचवीस तीस वर्षाच्या मुलाचे फुलांवर असणारे वेड त्याने लग्न फुलझाडे यांच्याशी केले. फुला वेगवेगळे प्रयोग करत असतो. गब्बरू हा सुद्धा त्याच्या शेजारी राहत असतो. गब्बरु फुलाचा प्रयोग काचेच्या घरातून लांबविण्याचा विचार करतो. आणि एक लाखाचे बक्षीस मिळवण्याचा गबरू विचार करतो.

फुलाला फाशीची शिक्षा या गोष्टीत फुलाला देशद्रोही प्रधान यांचे कागदपत्र तुझ्याकडे आहेत. तो फुला विसरला होता. ते कागदपत्र त्याच्या घरात निघतात म्हणून त्याला क्रूर शिपाई अटक करतात. गबरू या संधीचा फायदा घेतो तो रात्री काचेच्या फुलाच्या प्रयोगशाळेत जातो. आणि नवीन प्रयोग शोधतो त्याला मिळतं नाही. फुलाला फाशीची शिक्षा देण्यात आली. फुला ज्या तुरुंगात असतो त्या तुरुंगाचे अधिकारी डब्बूसाहेब असतात. त्यांची मुलगी कळी असते. कळीला फुलवणारा कोणी भेटला तर ती एकदम फुलेल. या कळीची आणि फुलाची ओळख होते. ते बोलतात.

राजा आला फुला वाचला, या गोष्टीत गबरू फुलाचे कपडे मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्याला फाशी झाली की त्याचे कपडे आपण घेऊ निश्चितच त्याच्या जवळ प्रयोग असतीलच. कळी फुला स फाशी होणार म्हणुन रडते. पण वधस्तंभाजवळ राजा येतो आणि सर्वांची सूडबुद्धी मावळली. फुला शांत उभा होता. तो सर्वांना म्हणतो हा निरपराध आहे तेव्हाच हा इतका शांत उभा आहे. फुला ला दुसऱ्या तुरुंगात नेण्यात आले. लोक राजाची स्तुती करू लागले.

समृद्र काठच्या तुरुंगात. कळी डब्बूसाहेबांना समुद्रा काठच्या तुरुंगात बदली करून घेण्यास सांगते. ती रोज फुला स भेटते. ती वाचायला लिहायला शिकते.फुला राहायचा त्या तुरुंगात एका पक्ष्याने घरटे बांधले डब्बूसाहेबांना त्याचा त्यावरून आणि लावलेल्या फुलांच्या वेलीवरून संशय आला. त्यांनी ती वेल उपटली आणि घरटे पण अंड्यासहीत उध्वस्त केले. फुलाला या गोष्टीचे खूप खूप वाईट वाटले.कळी आणि फुलातील ऋणानुबंध जिव्हाळा साने गुरुजी यांनी भावपूर्ण टिपला आहे.

तुरुंगातील प्रयोग आता प्रयोगाची काडी फुला कळीला लावण्यासाठी देतो.कळी ती काडी तुरुंगासमोरील बागेत लावते. आणि फुला कळीला दररोज त्या ह्यांची काळजी कशी घ्यावी ते दररोज सांगायचा. गबरू ती वेल पळविलं या भीतीत ती वेल कळी जेव्हा तोडते तेव्हा ती वेल तिच्या मुळ्या तुटल्यामुळे वाळते. कळी खूप रडते. फुला एक काडी आणखी कळीला लावण्यासाठी देतो. ती खोलीत लावण्यासाठी देतो. गबरू लक्ष देतो .वेगवेगळ्या रंगाचे पडदे खोलीला लावण्यात आले. त्यात ती वेल वाढू लागली.

गबरू त्या खोलीची चावी बनवितो आणि ती वेल तो पळवतो. सकाळी कळी नेणारं होती त्या अगोदर तो नेतो.कळी रोजनिशी घेते . फुलाचा प्रयोग यशस्वी झाला.

फुलाला दोन बक्षिसे गबरू हे फुल वेल मी लावली असे सांगतो . सर्व विचारतात तर म्हणतो मला त्या वेलीच्या फुलाचे रहस्य सांगता येणार नाही. तितक्यात कळी तेथे येते आणि ती म्हणते ही वेल माझी आहे . ही पहा रोजनिशी मी दररोज या वेलीची कशी



**पुस्तक परीक्षण**

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

काळजी घेतली ते या रोजनिशीत लिहिलेलं पहिले. राजा कळीचे आणि फुलाचे लग्न लावतो. फुलाला एक लाख रुपयाचे बक्षीस मिळाले . राजा कळी आणि फुलाच्या आयुष्यात अचंबित करणारा आनंद पेरतो.

नदी शेवटी सागराला मिळेल सर्वांत




देवाचा दरबार या प्रकरणात परमेश्वर आणि सैतान यांच्यात चर्चा होते. सैतान परमेश्वराला म्हणतो , मी माधवा वर प्रयोग करतो. मी हरलो तर तसे येऊन सांगतो. परमेश्वर सैतानाला म्हणतो. ठीक आहे जा ने मानवाला खाली खाली परंतु शेवटी तो चांगल्याकडेच वळेल यात मला मुळीच शंका नाही.

सर्वज्ञ माधव या प्रकरणात माधव हा रात्रंदिवस वाचत बसणारा होता. सर्व कला गुण त्याला अवगत होते. भूत विद्या पिशाच्च विद्या प्रेत विद्या यातही तो प्रवीण होता.

असमाधान या प्रकरणात माधवला पुस्तके नि: सार वाटत होतं. मी इतके वर्ष विद्यांचा अभ्यास करत होतो मला काय मिळाला. नि:शंक झालो का?

माधव आत्महत्येचे विचार करू लागला.

सैतानाशी करार सैतान माधवला म्हणतो की, मला पैशाचा मोबदला नको. बारा वर्ष मी तुम्ही जे जे सांगाल ते करणार बारा वर्षानंतर तुम्ही माझे गुलाम व्हायचे. हा क्षण अमर होवो ही शब्द जरा माझ्या तोंडातून बाहेर आले तर मी तुमचा गुलाम होईल.

प्रेमाचा प्याला या प्रकरणात माधव आणि सैतान पिशाच्च लोकी येतात तिथे त्याला एक पेय देण्यात येते ते पिल्यानंतर पहिली जी महिला दिसेल तिच्यावर माधवला प्रेम होणार असते.

मधुरीची भेट यात मधुरीवर माधवला प्रेम होते. तो तिला भेटण्यासाठी व्याकुळ होतो. अनेक आमिष दाखवून तो मधुरीला भेटत जातो. अनेक रात्री ते एकत्र घालवतात. आईला खोकल्याचे औषध देऊन मधुरी भेटायला जाते .

दु:खी मधुरी आईला औषध देते आणि माधवला भेटायला जाते. पण आई झोपते ती कधीच न उठण्यासाठी . शेजारचे लोक तिच्या भावाला माधुरी बद्दल सांगतात. भावाला मधुर रिचा राग येतो. सैतान याने मंधूरीच्या भावाच्या डोक्यात सोटा मारला आणि तो खाली पडला आणि मेला. आई आणि भाऊ गेले पण प्रियकर होता तो येईल या आशेवर ती जगत असते.

ती काळरात्र माधुरीला फासी होणार असते. पण माधव तुरुंगात सैतानाच्या मदतीने मदूरीला आणायला जातो ती येत नाही. तिला पश्चाताप होतो.

राजाच्या दरबारात राजा मागणी करतो की प्राचीन काळापासून आतापर्यंतच्या सर्वात सुंदर स्त्रिया झालेल्या त्यांचे दर्शन व्हायला हवे. माधव यात डाकीण यांची मदत घेतो. पण त्यांची एक अट असते माधवचा तोंडातून काय सुंदर ओ हो असे निघाले की सर्व गायब होणार होते.अनेक लावण्यवती स्त्रिया पहिल्या आणि एका स्त्रीला पाहून माधव मोहित झाला. आणि सर्व गायब झाले.

पुन्हा घरी आल्यावर तीन बहिणी माधवचा घरी येतात . दुःख देवता , निराशा ,चिंता या तीन बहिणी होत्या त्या. प्रत्येकीला माधव कारण सबब सांगून जायला सांगतो. पण चिंता देवी ला राग येतो आणि ती जाते ती माधवला आंधळ करून . बाह्यदृष्टी गेली पण अंतरदृष्टी कोण नेणार. आनंद सर्वत्र पसरणे केवढ थोर काम.ते करू. आनंदला जीवनात अमर करू दे असे माधव म्हणाल्या बरोबर त्याचे प्राण निघून जातात.

स्वर्गात. त्याचा आत्मा नेण्यासाठी देवाचे आणि सैतान दूत येतात. मनुष्याचा कितीही अध: पत झाला तरी शेवटी तो वर येतो. हे सिद्ध झाले. मनुष्य शेवटी चांगला होतो.

एका बैठकीतच हे पुस्तक वाचून काढले . अनेक मूल्य यातून रुजले. फुलाचे नि:स्वार्थ जगाने मनाला भाराऊन टाकतो.

माधवा हा अनेक मोहाला बळी पडतो परंतु तो मृत्यूच्या वेळी अतिशय चांगला होतो. त्याच्यातील चांगुलपणा जागृत होतो. साने गुरुजींच्या संवेदनशील लेखणीला कोटी कोटी सलाम अतिशय हृदयस्पर्शी गोड गोष्टी पुढे काय होणार ही उत्सुकता शेवटपर्यंत टिकून राहिली. सर्वांनी वाचावे आणि वर्तनात रुजवावी अशी समृद्ध विचारधारा.

# भारतीय लोकशाहीचे शिल्पकार: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. समाजाच्या तळागाळातील लोकांना अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे बाबासाहेब केवळ कायदेपंडितच नव्हते, तर एक समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ आणि मानवाधिकारांचे कट्टर समर्थक होते. त्यांची दूरदृष्टी, संघर्षशीलता आणि धाडसी निर्णयक्षमता यामुळे भारतातील लोकशाही व्यवस्था अधिक सुदृढ झाली आहे.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू (मध्य प्रदेश) येथे झाला. अस्पृश्य समाजात जन्मलेल्या बाबासाहेबांना बालपणापासूनच सामाजिक भेदभाव सहन करावा लागला. मात्र, शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे, याची जाणीव त्यांना लहानपणापासूनच झाली होती. त्यांच्या वडिलांनी शिक्षणाची गोडी लावल्यामुळे त्यांचा शिक्षणाकडे ओढा वाढला.आपल्या अथक परिश्रमाने त्यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी कायद्याचे आणि अर्थशास्त्राचे गाढे अध्ययन केले आणि त्याचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी केला. शिक्षणामुळेच ते अन्यायाविरुद्ध उभे राहू शकले आणि भारतातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे नेतृत्व करू शकले.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली. त्यांनी भारतीय राज्यघटनेत प्रत्येक नागरिकाला समान हक्क देण्यावर भर दिला. समानता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित संविधान निर्माण करून त्यांनी भारताला लोकशाही मार्गावर नेले. आज भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे आणि प्रगत संविधान मानले जाते.बाबासाहेबांनी राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश करून नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण केले. त्यांनी शोषित, वंचित आणि मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद केली, जेणेकरून त्यांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल. त्यांनी केलेली कामे आजही भारतीय लोकशाहीला बळकट करतात.बाबासाहेबांनी समाजातील जातिभेद, अस्पृश्यता आणि विषमता संपवण्यासाठी अनेक चळवळी



केल्या. १९२७ साली त्यांनी महाड येथे चवदार तळे सत्याग्रह केला, ज्याद्वारे दलितांना पाणी पिण्याचा अधिकार मिळवून दिला. त्यांनी 'मनुस्मृती दहन' आंदोलनाद्वारे जातीय भेदभावाविरोधात आवाज उठवला. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतात सामाजिक न्यायाची चळवळ अधिक बळकट झाली. समान हक्क मिळावेत म्हणून त्यांनी 'मुक्तीगाथा', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि इतर अनेक नियतकालिकांच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या विचारांमुळे अनेकांना प्रेरणा मिळाली आणि सामाजिक परिवर्तनाची लाट निर्माण झाली.

बाबासाहेबांचा विश्वास होता की शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आणि विद्यार्थीवृत्ती योजना सुरू केल्या. तसेच, भारताच्या आर्थिक विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण धोरणे सुचवली. जलसंपत्तीचे नियोजन, औद्योगिकीकरण आणि कृषी सुधारणा यासंदर्भात त्यांनी महत्त्वपूर्ण सल्ले दिले. त्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या आर्थिक विचारांमुळे भारताची आर्थिक धोरणे अधिक मजबूत झाली. त्यांनी सुचवलेल्या औद्योगिक धोरणांमुळे देशाच्या प्रगतीला चालना मिळाली.बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वावर त्यांनी मानवतावादाचा विचार पुढे नेला. त्यांचे बौद्ध धर्म स्वीकारणे हे केवळ धार्मिक परिवर्तन नव्हते, तर सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण पाऊल होते. त्यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हे ग्रंथ लिहून बौद्ध धर्माचे महत्त्व स्पष्ट केले.बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर लाखो लोकांनी त्यांचा आदर्श स्वीकारला. त्यांनी अहिंसा, समता आणि बंधुता यांचे तत्त्वज्ञान मांडले आणि समाजात परिवर्तन घडवून आणले. आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य संपूर्ण भारतात प्रेरणादायी ठरत आहेत. लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी त्यांनी घडवलेले संविधान, सामाजिक न्यायासाठी घेतलेली भूमिका आणि शिक्षण प्रसाराचे योगदान यामुळे ते भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी सदैव मार्गदर्शक राहतील.आज जगभरात आंबेडकर विचारांचा प्रसार होत आहे. अनेक देशांमध्ये त्यांच्या कार्याचा अभ्यास केला जात आहे. त्यांनी मांडलेल्या समतेच्या तत्त्वांवर आधारित समाजनिर्मितीसाठी आजही अनेक चळवळी सुरू आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही, तर ते आजच्या काळातही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांचे विचार आणि तत्वज्ञान आचरणात आणून आपण भारताला अधिक समतावादी, न्यायप्रिय आणि लोकशाहीप्रधान राष्ट्र बनवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! आजच्या तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांवर चालत शिक्षण, समाजसुधारणा आणि लोकशाही मूल्यांना अधिक बळकटी द्यावी. यामुळेच आपण त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान करू शकतो. बाबासाहेबांचे जीवन आणि विचार हे संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहेत.



**रामदास वाघमारे,**
छत्रपती संभाजीनगर,
मो.नं.८८८८१२५६१०

**(लेखक महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक आहेत)**

# शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी भौतिक व शैक्षणिक साधनसामुग्री पुरवा-शालेय शिक्षण राज्यमंत्री

**ज्योतिर्मय साहित्य**

**अमरावती** – गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मुलभूत अधिकार आहे. त्यानुषंगाने शासनाकडून निपूण महाराष्ट्र अभियान, आदर्श शाळा, सीएमश्री शाळा, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान असे विविध उपक्रम व विद्यार्थी लाभाच्या योजना राबविल्या जातात. राज्यातील प्रत्येक शाळा ही आदर्श शाळा बनण्यासाठी त्याठिकाणी खासगी शाळांप्रमाणे भौतिक व शैक्षणिक साधनसामुग्री पुरवून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना आज दिले.



येथील महानगरपालिकाच्या सभागृहात आयोजित बैठकीत राज्यमंत्री श्री. भोयर यांनी अमरावती विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, शिक्षण उपसंचालक निलिमा टाके तसेच पाचही जिल्ह्यांचे प्राथमिक/माध्यमिक शिक्षणाधिकारी, डायटचे प्राचार्य यावेळी उपस्थित होते.

श्री. भोयर म्हणाले की, मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत सात कलमी कार्यक्रमाची अमरावती विभागात प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, गुंतवणूक प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या सात कलमी कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कार्याबाबत राज्यमंत्र्यांनी आढावा घेतला. प्रत्येक तालुक्यात किमान दोन आदर्श शाळा निर्मितीसाठी सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री, आमदार यांना शाळा दत्तक घेण्याची मागणी करुन पालकमंत्री आदर्श शाळा, आमदार आदर्श शाळा निर्मितीसाठी सहाय्यता करण्याबाबत विनंती करण्यात यावी. विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात शिक्षण घेता यावे, यासाठी प्रत्येक शाळेचे दर्जेदार बांधकाम, त्याठिकाणी शुध्द पिण्याचे पाणी व मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह यासारख्या प्राथमिक सुविधांची तजवीज करावी, असेही त्यांनी सांगितले.

विभागात ७२ आदर्श शाळांकरिता ६० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून नियोजन आराखड्यानुसार सर्व शाळांचे बांधकाम पूर्ण करण्यात यावीत. प्रत्येक शाळेत भौतिक सोयी-सुविधा आणि शैक्षणिक साधनसामुग्री उपलब्ध करुन द्याव्यात. शाळांमध्ये डीजटिल क्लासरुम, पायाभूत सुविधांची उभारणी, ग्रंथालय, खेळाचे मैदान, शुध्द पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी प्राथमिक सुविधा निर्माण करण्यात याव्यात. आदर्श शाळांच्या निर्मितीसाठी समन्वय व देखभाल संबंधी डायटचे प्राचार्यांनी जबाबदारी पार पाडावी. विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात ज्ञानार्जन करता यावे, यासाठी विद्यार्थीहिताच्या दृष्टीने नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे, यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची तरतूद उपलब्ध करुन दिली जाईल, असेही राज्यमंत्री भोयर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी निपूण महाराष्ट्र अभियान, आदर्श शाळा, सीएमश्री शाळा, नवीन राष्ट्रीय धोरण, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान, विविध गुणवत्तापूर्ण व नाविण्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थी लाभाच्या योजना व अंमलबजावणी यासंदर्भात संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून राज्यमंत्र्यांना माहिती दिली.

महापालिका प्रशासनाच्या अखत्यारित येत असलेल्या शाळाबाबत व शैक्षणिक सोयी सुविधाबाबत आयुक्त श्री. कलंत्रे यांनी राज्यमंत्री श्री. भोयर यांना सविस्तर माहिती दिली. महापालिकांच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण पध्दतीमुळे विद्यार्थी संख्या ६ हजार ५०० वरुन ९ हजार ५०० वाढ झाल्यानिमित्त राज्यमंत्र्यांच्या हस्ते आयुक्त श्री. कलंत्रे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.



# कोमल मलिक - मनाळ लिखित देव तीर्थ कवितासंग्रहाचे महंत रामगिरीजी महाराजांच्या हस्ते प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**गंगापूर** – तालुक्यातील वाहेगाव येथील नवोदित कवयित्री सौ. कोमल अक्षय मनाळ-मलिक लिखीत देव तीर्थ कवितासंग्रह छत्रपती संभाजीनगर येथील वर्डलॅन्ड पब्लिशिंग हाऊस या संस्थेने प्रकाशित केले असून रविवार रोजी रामनवमीच्या दिवशी कवितासंग्रहाचे प्रकाशन सरला बेटाचे महंत रामगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते वाहेगाव येथे थाटात पार पडले.

आई आणि वडील या दोन घटकांच्या वलयाभोवती फिरणारा देव तीर्थ हा साहित्य क्षेत्रातील एकमेव कवितासंग्रह होय. कवितासंग्रहातील असलेल्या ४२ कविता या फक्त आई-वडीलावरच लिहिल्या गेलेल्या आहेत. हे कवितासंग्रहाचे विशेष म्हणावे लागेल. कवितासंग्रहात आईची महती, प्रेम, ममता, जिव्हाळा, माय लेकीच एकमेकांपासून दूर असणं, वडिलांचा त्याग त्यांच्या डोळ्यात येणारे अश्रू अत्यंत प्रभावीपणे, साध्या आणि सोप्या भाषेत रेखाटले आहे. बापाचा त्याग समजून घेतांना वाचकाच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. यातच कवितासंग्रहाचे यश दिसून येते. आई आणि बाप कविता वाचल्यानंतर एक लक्षात येते, मातृ पितृ देवो भव: ही संस्कृत पंक्ती कवयित्रीने आपल्या आयुष्यात सार्थ केलेली दिसून येते.

कवयित्री सौ. कोमल अक्षय मनाळ-मलिक यांना लेखनाची प्रेरणा आई-वडील याच्यापासून मिळालेली आहे. तसेच पुस्तक प्रकाशनासाठी पती अक्षय मनाळ तसेच सासू - सासरे, मामा - मामी, व युवा व्याख्याती तथा कवयित्री कु. वैष्णवी मनाळ, ग्रामीण साहित्यिक तथा संपादक बाबा चन्ने यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

# 'प्रेम कधीही, कुठेही, कुठल्याही वयात होऊ शकतं'

## येत्या १ मे रोजी ढवळे आणि माने कुटुंब घेऊन येणार मुरलेल्या प्रेमाचा 'गुलकंद'!

**ज्योतिर्मय साहित्य**

मागील काही दिवसांपासून प्रेक्षक ज्या ट्रेलरची आतुरतेने वाट पाहात होते, त्या 'गुलकंद' चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला असून, या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आता आणखीच वाढली आहे. एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आणि वेटक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला 'गुलकंद' हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर करण्यास सज्ज आहे.

चित्रपटाचा भव्य ट्रेलर लॉन्च सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी ढवळे फॅमिली म्हणजेच सई ताम्हणकर आणि समीर चौघुले यांनी स्कुटरवर, तर माने फॅमिली म्हणजे ईशा डे आणि प्रसाद ओक यांनी बुलेटवर शानदार एंट्री घेतली. पुष्पवृष्टीने कलाकारांचे स्वागत करण्यात आले आणि 'चल जाऊ डेटवर' या धमाल गाण्यावर कलाकारांनी थिरकत रंगतदार माहोल निर्माण केला.

अलिकडेच प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये सई आणि प्रसाद यांच्या एका खास सीनमुळे प्रेक्षकांमध्ये बरीच चर्चा रंगली होती. आता ट्रेलरमधून ''प्रेम कधीही, कुठेही, कुठल्याही वयात होऊ शकतं'' या प्रसादच्या संवादाने उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

कथेत ढवळेंची मुलगी मीनाक्षी आणि मानेंचा मुलगा ओंकार यांच्या लग्नासाठी दोन कुटुंबं एकत्र येतात. पण या भेटीत अजून एक वेगळंच नातं निर्माण होतं. आता ढवळे आणि माने कुटुंबांमध्ये काय गोंधळ उडणार? आणि ही गुंतागुंत सुटेल का? याचं उत्तर १ मे रोजी प्रेक्षकांना चित्रपटगृहात मिळणार आहे.

'गुलकंद' हा एक हलकाफुलका कौटुंबिक विनोदी चित्रपट असून, नात्यांमधली गुंतागुंत, भावना, हास्य आणि गोडवा यांचा एक सुरेख मेळ ट्रेलरमध्ये दिसून येतो. ढवळे-माने कुटुंबांच्या संसारात मुरलेला 'गुलकंद' प्रेक्षकांसाठी एक परिपूर्ण मनोरंजनाचा अनुभव ठरेल, याची खात्री आहे. चित्रपटात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, आणि शार्विल आगटे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाची निर्मिती सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया यांनी केली आहे.

दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणतात, ''नातं जेव्हा एकसुरी होतं, तेव्हा त्यातला गोडवा टिकवणं महत्त्वाचं ठरतं, आणि हाच गोडवा 'गुलकंद' चित्रपटात आहे. प्रत्येक पात्र प्रेक्षकांना आपलं वाटेल. आजवर आम्ही अनेक विनोदी प्रोजेक्ट्स केले, पण या चित्रपटात भावना, नाती, प्रेम आणि विनोद यांचा सुंदर संगम आहे. एव्हरेस्टचे संजय छाब्रिया या कुटुंबाचा भाग झाले, हे आमचं भाग्य. ही टीम एकमेकांना ओळखते, त्यामुळे 'गिव्ह अँड टेक' अप्रतिम झाला आहे. हाच अनुभव प्रेक्षकांना मिळेल.''

निर्माते संजय छाब्रिया म्हणतात,




'''गुलकंद' हे आमचं एक खास सिनेमॅटिक गिफ्ट आहे. दर्जेदार आणि संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा असा चित्रपट आम्ही आणत आहोत. कलाकार, दिग्दर्शक, सगळ्यांनी कमाल काम केलं आहे. मला विश्वास आहे की, प्रेक्षकांना या गोडसर अनुभवाचा नक्कीच आनंद मिळेल.''

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559